जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 SEP 2017
पुढारी

# कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना 'मराठवाडा भूषण' पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



पुणे येथील मराठवाडा समन्वय समितीच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा 'मराठवाडा भूषण पुरस्कार' यंदा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांना जाहीर झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल हा पुरस्कार डॉ. शिंदे यांना जाहीर करण्यात आला. रविवारी (दि. १७) सायं. ६ वाजता पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिर येथे डॉ. शिंदे यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

मराठवाडा समन्वय समितीतर्फे दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीदिन महोत्सव साजरा करण्यात येतो. या निमित्ताने विविध क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी करून मराठवाड्याचा लौकिक सर्वदूर करणाऱ्या मान्यवरांना मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सुभाष वारे, पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गुत्ते, लेखक डॉ. शमशुद्दीन तांबोळी, उद्योजक ओमप्रकाश पेठे आणि प्रगतशील शेतकरी ईश्वरदास घनघाव यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बी.व्ही.जी. इंडिया कंपनीचे संस्थापक व चेअरमन हनुमंतराव गायकवाड उपस्थित राहणार असून ज्येष्ठ समाजसेवक डॉ. द्वारकादास लोहिया अध्यक्षस्थान भुषविणार आहेत. या प्रसंगी वैभवशाली मराठवाडा २०१७या विशेषांकाचे प्रकाशन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार



**कोल्हापूर :** पुणे येथील मराठवाडा समन्वय समितीच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारा 'मराठवाडा भूषण पुरस्कार' यंदा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांना जाहीर झाला. रविवारी (ता. १७) पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. शिंदे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सुभाष वारे, पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गुत्ते, लेखक डॉ. शमशुद्दीन तांबोळी, उद्योजक ओमप्रकाश पेठे, ईश्वरदास घनघाव यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

.15 SEP 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# कुलगुरू देवानंद शिंदे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

पुणे येथील मराठवाडा समन्वय समितीतर्फे दरवर्षी देण्यात येणारा 'मराठवाडा भूषण पुरस्कार' यंदा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना जाहीर झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल येत्या रविवारी (दि. १७) सायंकाळी ६ वाजता पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात डॉ. शिंदे यांना हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

मराठवाडा समन्वय समितीतर्फे दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिदिन महोत्सव साजरा करण्यात येतो. विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावून मराठवाड्याचा लौकिक सर्वदूर



पोहोचविणाऱ्या मान्यवरांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात येते. या वर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सुभाष वारे, पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गुत्ते, लेखक डॉ. शमशुद्दीन तांबोळी, उद्योजक ओमप्रकाश पेठे आणि प्रगतिशील शेतकरी ईश्वरदास घनघाव यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून बीव्हीजी इंडिया कंपनीचे संस्थापक व चेअरमन हनुमंतराव गायकवाड उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. द्वारकादास लोहिया हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. वैभवशाली मराठवाडा २०१७ या वार्षिक विशेषांकाचेही मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

15 SEP 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बालहक्कांच्या जागृतीसाठी योगदान द्या : डॉ. नांदवडेकर



कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

कोल्हापूर, ता. १४ : बालहक्कांच्या संदर्भात जागृतीसाठी प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी कृतिशील योगदान द्यावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण पत्रकारांसाठी आयोजित बालहक्कविषयक जागृतीपर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. मानव्यविद्या सभागृहात ही कार्यशाळा झाली.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, की बालहक्कांचा विषय माध्यमांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी योग्य पद्धतीने मांडल्यास हजारो हात मदतीसाठी पुढे सरसावतील. आज आपल्या देशातील साधारण निम्म्या बालकांना पुरेसा आहार मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या बालकांचे योग्य संगोपन होऊन त्यांना देशाच्या विकासातील भागीदार बनवायचे असेल तर बाल आरोग्याचा प्रश्न प्राधान्याने हाताळायला हवा. बालमजूर आढळल्यास त्यांच्याशी संवाद साधून, योग्य मार्गदर्शन करून त्यांना शाळेत जायला प्रवृत्त करायला हवे. अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी 'युनिसेफ'चे संवाद सल्लागार तानाजी पाटील, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह जिल्ह्यातील ग्रामीण पत्रकार, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यशाळेत सी.डब्ल्यू.सी. (कोल्हापूर)चे अतुल देसाई, 'युनिसेफ'चे तानाजी पाटील आणि कोल्हापूरच्या शहाजी विधी महाविद्यालयाचे डॉ. प्रवीण पाटील यांनी बालहक्कांच्या विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 SEP 2017

महाराष्ट्र टाईम्स

# 'बालहक्कांसाठी सर्वांनी योगदान द्यावे'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'बालहक्कांच्या संदर्भात जागृतीसाठी प्रसारमाध्यमांनी कृतिशील योगदान देणे महत्त्वाचे आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण पत्रकारांसाठी आयोजित बालहक्कविषयक जागृतीपर एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात ही कार्यशाळा झाली.



डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'बालहक्कांचा विषय माध्यमांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी योग्य पद्धतीने मांडल्यास हजारो हात मदतीसाठी पुढे सरसावतील. आज आपल्या देशातील साधारण निम्म्या बालकांना पुरेसा आहार मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या बालकांचे योग्य संगोपन होऊन त्यांना देशाच्या विकासातील भागीदार बनवायचे असेल तर बाल आरोग्याचा प्रश्न प्राधान्याने हाताळायला हवा. आरोग्य चांगले राहण्यासाठी उत्तम आहार आणि त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उत्तम शिक्षण सुविधांची उपलब्धता करून देणे हे आपल्यापुढील प्राधान्यक्रमाचे मुद्दे असायला हवेत. अन्न आणि शिक्षणाच्या बरोबरीनेच बालमजुरीला प्रतिबंध करण्यासाठी पत्रकारांबरोबरच प्रत्येक समाजघटकाने कृतीशील पुढाकार घ्यायला हवा. असे बालमजूर आढळल्यास त्यांच्याशी संवाद साधून, योग्य मार्गदर्शन करून त्यांना शाळेत जायला प्रवृत्त करायला हवे.'

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी मध्य आफ्रिकेतील रवांडा या देशाला भेट दिली होती. तेथील बालकांची विदारक परिस्थिती त्यांनी यावेळी सभागृहासमोर मांडली.

अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत केले. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी युनिसेफ (महाराष्ट्र)चे संवाद सल्लागार तानाजी पाटील, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह जिल्ह्यातील ग्रामीण पत्रकार, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, दिवसभरात कार्यशाळेत सीडब्ल्यूसी (कोल्हापूर)चे अतुल देसाई, युनिसेफचे तानाजी पाटील आणि कोल्हापूरच्या शहाजी विधी महाविद्यालयाचे डॉ. प्रवीण पाटील यांनी बालहक्कांच्या विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकला.

15 SEP 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सिनेट'साठी १७ नोव्हेंबरला मतदान

## ५० जागांसाठी होणार निवडणूक : २० नोव्हेंबरला मतमोजणी, निकाल

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी 'विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीसाठी १७ नोव्हेंबरला मतदान होत आहे. मतमोजणी आणि निकाल २० नोव्हेंबरला जाहीर होणार आहे. शिवाजी विद्यापीठात गुरूवारी झालेल्या बैठकीत सिनेट निवडणुकीवर शिक्कामोर्तब केले. प्राध्यापक संघटनांच्या मागणीवरून हा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केल्याची माहिती अधिकृत सुत्रांनी दिली. निवडणुकीत १९ हजार पदवीधर तर ३ हजार प्राध्यापक मतदानाचा हक्क बजावणार आहेत. ५० जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. दिवाळी सुट्टीनंतर सिनेट निवडणूक घेतल्याने प्राध्यापक संघटनांनी समाधान व्यक्त केले आहे.

'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक' विधानसभेत वर्षभरापूर्वी मंजूर झाले. त्यामुळे सर्वच निवडणुकां नवीन कायद्यानुसार घेण्यात येणार आहेत. विद्यापीठ सिनेट



- डॉ. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत शिक्कामोर्तब
- १९ हजार पदवीधर, ३ हजार प्राध्यापकांना मतदानाचा हक्क

निवडणुकांच्या परिनियमानुसार या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. एकूण १९ हजार इतकी नवीन व जुनी पदवीधर नावनोंदणी झाली आहे. तर प्राचार्य, प्राध्यापकांची ३ हजार इतकी नोंदणी झाली आहे.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ विकास आघाडी या निवडणुकीत उतरणार आहे. या आघाडीत शिक्षक संघटना, संस्थाचालक, प्राचार्य असोशिएशन, सेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परीषद असणार आहे. 'सुटा'च्या कार्यकारिणी सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली सुटा निवडणूक लढवणार आहे. त्यासंदर्भात १५ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत जिल्हास्तरीय बैठकीत नावावर शिक्कामोर्तब होणार आहे.

### नव्या कायद्यानुसार निवडणूक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम २७ नुसार कुलपतींच्या मान्यतेने प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीची पात्रता प्रसिध्द केली आहे. यामध्ये प्राचार्य, प्राध्यापक, विद्यापीठ अध्यापक, नोंदणीकृत पदवीधर (कलम २), व्यवस्थापन परिषद (कलम ३०), विद्या परिषद (कलम ३२) नुसार ८ शिक्षक, अभ्यास मंडळ (कलम ४०) नुसार ३ कॉलेजचे विभागप्रमुख, अधिसभा (कलम २८) नुसार कॉलेज, विद्यापीठ शिक्षक, प्राचार्य, संस्थाचालक, १० पदवीधर या पदांसाठी निवडणूक होणार आहे.

15 SEP 2017 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एसआरपीडीसंदर्भात प्राचार्यांना मार्गदर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षांना ४ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. एकूण अभ्यासक्रमापैकी तेरा अभ्यासक्रमांच्या परीक्षा एसआरपीडी प्रणालीद्वारे म्हणजेच ई-मोडद्वारे घेण्यात येणार आहेत. त्यामुळे बुधवारी विवेकानंद महाविद्यालयातील आयोजित कार्यशाळेत एसआरपीडी (सिक्युअर्ड रिमोट पेपर डिस्ट्रीब्युशन) प्रणालीच्या सॉफ्टवेअरबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

विवेकानंद महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभागातर्फे एसआरपीडीसंदर्भात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला १२ प्राचार्य व ३०० प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी हजेरी लावली. गतवर्षी एसआरपीडीसंदर्भात आलेल्या अडचणी समजावून घेवून, त्यावर उपाययोजना काय करायच्या यासंदर्भात मार्गदर्शन केले. परीक्षेच्या कामामध्ये प्राध्यापकांचा सहभाग वाढण्याची गरज असल्याचे सांगितले. सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयातही एसआरपीडीसंदर्भात कार्यशाळा पार पडली.



महेश काकडे

गतवर्षी शिवाजी विद्यापीठाने एसआरपीडीच्या माध्यमातून घेतलेल्या परीक्षा यशस्वी झाल्या. यावर्षी परीक्षेत वाढ केली असून एकूण ३३०० पेपर एसआरपीडीच्या माध्यमातून घेण्यात येणार आहेत, असेही सांगितले. तसेच या परीक्षा घेताना महाविद्यालयाला आलेल्या अडचणी विद्यापीठ प्रशासनाने समजून घेतल्या. विद्यापीठाने अनेक अंडचणींवर मात करीत गतवर्षीपासून नवीन संगणक प्रणाली स्वीकारली असून ती यशस्वीही झाली आहे. त्यासंदर्भात सुरूवातीला विरोध करणाऱ्या महाविद्यालयाने परीक्षा विभागाचे अभिनंदनही केले. महाविद्यालयांनीही या संगणक प्रणलीचा अवलंब करून परीक्षेसंदर्भात गोपनीयता राखण्यासाठी समंती दर्शवली. तसेच एसआरपीडीच्या माध्यमातून प्रश्नपत्रिकांची गुप्तता ठेवण्यासाठी प्राचार्यांच्या मेलवर प्रश्नपत्रिका पाठवली जाणार आहे. प्रत्येक प्राचार्यांना एक लॉग इन आयडी दिला जाणार आहे. त्याच्या माध्यमातून प्रश्नपत्रिकेची प्रिंट कशी घ्यायची, आदी विषयांवर पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन केले. एसआरपीडीसंदर्भात कोणती दक्षता घ्यावी, प्रश्नपत्रिकेची वितरण पध्दत कशी असेल यासंदर्भात परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्य डॉ. सुरेश गवळी, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, यांच्यासह १२ प्राचार्य व प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 SEP 2017

Times of India

# SRPD system to be extended to over 600 new subjects

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will be extending its secured remote paper delivery (SRPD) system to over 600 new subjects from the October 2017 semester examination. At present around 2,600 subjects' question papers use the SRPD system.

Mahesh Kakade, Director, Board of Examinations and evaluation, SUK said that the new subjects are mainly from BCom, IT, MCom, BA sixth semester and other traditional courses.

He said that workshops related to the extended subjects were conducted across Kolhapur, Sangli and Satara districts.

Kakade told **TOI**, "Until now we were using the system for around 2,600 papers of engineering, pharmacy and other courses. These papers were securely transferred to the exam centres via SRPD. They received positive response from associated colleges as well as the officials concerned."

According to Kakade, SRPD system has proven best when it comes to confidentiality barring a few exceptional events like power failure, unavailability of internet, and technical difficulties in the computer system at the host colleges. These events had a minor impact on the working of the system.

"We have asked the officials at the exam centres, if there is delay in the delivery of examination question paper, the university has strictly instructed to provide additional time to the students, for the time lost," Kakade said.

On the working of SRPD, Kakade said that under the new system, the examination department can send the question papers directly to the examination centres in an encrypted format via online. Nobody can decrypt the online copy of the paper. At the examination centre too, the concerned authority are given two onetime passwords, one to decrypt the document and the other one to download it.

At present SRPD is being used for a few undergraduate engineering and pharmacy courses along with management courses in the colleges in Sangli, Satara and Kolhapur districts.

15 SEP 2017 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# UGC to set up world class institutes of eminence

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has invited proposals from existing government, private and the sponsoring institutions to set up Institution of Eminence (IOE). The UGC guidelines regarding IOE were released earlier this week.

"The objective is to provide greater academic, financial, administrative and other regulatory autonomy to 10 public and 10 private higher educational institutions to emerge as world class teaching and research institutions," reads a UGC press statement released on Tuesday.

The institutions declared as IOE will be free from the usual regulatory mechanism to choose their path to become institutions of global repute. Their emphasis will be on multi-disciplinary initiatives, high quality research, global best practices and international collaborations.

**Their emphasis will be on multi-disciplinary initiatives, high quality research, global best practices and international collaborations**

The government educational institutions selected as public institutions of eminence under this scheme will be given financial incentives. Those selected as private and sponsoring organisations will be declared as Institutions of Eminence, deemed to be universities.

Apart from regular courses, the institutes desirous of the IOE grants should also offer various inter-disciplinary courses. They would include in areas of emerging technology and interest as well as those of relevance to the development concerns of the country. The institute should also have a good proportion of foreign or foreign quality faculty.

The UGC guidelines suggest that the IOE institute should come in the top 500 of any of the world renowned ranking frameworks within the first 10 years. Furthermore, the institute should consistently improve its ranking to come in the top 100 eventually over time.

The financial assistance would be up to an amount of Rs 1,000 crore or 50-75% of the requirement projected in the perspective and detailed plans in a span of five years.

On the eligibility, it said that a total 10 institutions under this category shall be selected to be declared as Institutions of Eminence. These institutions would be a mix of technical, management and arts institutions.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 5 SEP 2017
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे मार्च-एप्रिल २०१७ मध्ये झालेल्या बीसीए परीक्षेत प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजची विद्यार्थीनी मंजिरी पाटील हिने ३६०० पैकी ३०४७ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. तिला संस्थेचे चेअरमन डी. बी. पाटील, प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे, उपप्राचार्य डॉ. ए. ए. कलगोंडा, बीसीए विभागप्रमुख डॉ. ए. एम. शेख, बीबीए विभागप्रमुख डॉ. ए. जी. सूर्यवंशी आदींचे मार्गदर्शन लाभले.